# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२२

## (सकाळी १०.०० ते ११.०० वाजता)

**म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**सर्वश्री अंबादास दानवे,** शशिकांत शिंदे, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमरनाथ राजूरकर, सचिन अहिर, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमोल मिटकरी, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"भंडारा जिल्ह्यातील पीडित महिला मागील अनेक वर्षापासून सावरटोली (ता.गोरेगाव, जि.गोंदिया) येथे बहिणीकडे राहत असणे, बहिणीबरोबर किरकोळ वाद झाल्यानंतर भावनेच्या भरात आईकडे भंडारा जिल्ह्यात पायी चालत जात असताना दिनांक ३० जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान गोरेगाव तालुक्यातील श्रीराम उरकुडे या आरोपीने गाडीत मदत देण्याच्या बहाण्याने गोंदिया जिल्ह्यातील मुंडीपार व पळसगाव येथे दोन दिवस बलात्कार करुन पिडित महिलेस विवस्त्र अवस्थेत जंगलात सोडून देणे, या महिलेची मुरमाळी येथील महिला पोलीस पाटील यांनी विचारपूस करून ११२ क्रमांकावर माहिती दिल्यानंतरही पोलिसांनी लाखनी पोलीस स्टेशन येथे नेऊन महिलेची विचारपूस व चौकशी करून पुढील तपास करणे व रुग्णालयात दाखल करणे बंधनकारक असताना पोलिसांनी कोणतीही कार्यवाही न करणे, तसेच कोथुर्णे, ता.मावळ, जि.पुणे येथे गावातील ७ वर्षीय बालिकेचे अपहरण करुन बलात्कार केल्यानंतर निघृणपणे हत्या केली असणे, तसेच अमरावती येथील महिलेवर २ नराधमांनी पिली गावालगत असलेल्या जंगलात नेऊन बलात्कार, शिवीगाळ करणे व मारहाण करणे, अशा गंभीर घटना राज्यात सुरु असून जनतेमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असणे, राज्यात अशा घटना वारंवार घडत असून समाजकंटकांवर अंकुश ठेवण्यात पोलीसांना अपयश येणे, सदरहू घटना घडल्यानंतर राज्यात पोलीसांचा धाक राहिलेला नसून गुंड प्रवृत्ती वाढत असल्याचे दिसून येणे, यासाठी करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (सकाळी ११.०० ते ११.४५ वाजता)

**सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा – (दुसरा व शेवटचा दिवस).**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

(१) मुख्यमंत्री.

(२) उप मुख्यमंत्री.

(३) महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री

(४) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री

(५) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री

(६) आदिवासी विकास मंत्री

(७) ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री

(८) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

(९) अन्न व औषध प्रशासन मंत्री

(१०) कामगार मंत्री.

(११) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

(१२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

(१३) कृषी मंत्री.

(१४) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री

(१५) सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री.

(१६) पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री.

**(दुपारी १२.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**(१) उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री :**

**(क)** "विधानपरिषदेच्या सन २०२२ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक ३ मार्च, २०२२ ते दिनांक २५ मार्च, २०२२ या कालावधीत मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण ६१ आश्वासनांची यादी, तसेच सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ११० आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह" सभागृहासमोर ठेवतील

**(ख)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०२०-

२०२१ या वर्षाचा चौसष्टावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उद्योग मंत्री** : "महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचा अनुक्रमे अडतीसावा व एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास).**

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(१)** **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, अब्दुल्ला खान दुर्राणी, अमरनाथ राजूरकर, अंबादास दानवे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सन २०२०-२०२१ या वर्षी गंगापूर (जि.औरंगाबाद) नगर परिषदेची निवडणूक कोविड-१९ मुळे पुढे ढकलण्यात येवून नगर परिषद गंगापूर येथे प्रशासकाची नेमणूक झालेली असणे, सदरच्या कालावधीत प्रशासक/मुख्याधिकारी व पाणी पुरवठा अभियंता यांनी संगनमत करुन खोटे व बनावट दस्तएवज तयार करुन विविध कामाची बिले सादर करुन न झालेल्या कामाबाबतची बिले हे ठराविक ठेकेदारास वितरीत केली असणे, व त्यामाध्यमातून नगरपरिषदेच्या पैशाचा अपहार केला असणे, त्यामुळे तत्कालीन नगराध्यक्ष व शहरवासी यांनी तत्कालीन प्रशासक/मुख्याधिकारी व पाणी पुरवठा अभियंता यांनी सदर कालावधीत अदा कलेल्या विविध कामाच्या बिलाची चौकशी करण्यासाठी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केले असणे, नगर परिषद गंगापूर येथे फक्त ठराविक ठेकेदार व अधिकारी यांना आर्थिक लाभ होण्याच्या हेतूने निविदा प्रकाशित न करता विकास कामे दाखवून आर्थिक गैरव्यवहार केला असणे, सदरील रस्त्याची कामे हे कधीही झालेली नसणे, नाही सदरील

कामे पूर्ण झाल्याचे दर्शविण्यात आले असणे, नियमानुसार रस्त्याची कामे पुर्ण झाल्यानंतर त्रयस्थ संस्थेमार्फत पडताळणी करणे आवश्यक असते परंतू तसे झालेले नसणे, सदरील एजन्सीचे कुठल्याही प्रकारचे बांधकाम व वास्तूविशारदाच्या नोंदी शिवाय महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडेही ठेकेदाराची नोंदणी नसतानाही त्यांना रक्कम अदा केली असणे, सदर ठेकेदारास सन २०२०-२१ या काळामध्ये कामे दाखवून संगनमताने आर्थिक गैरव्यवहार केला असणे, आर्थिक गैरव्यवहार करण्याच्या हेतूनेच अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमत करुन रु.१५० लक्ष रुपयांचा अपहार केलेला असणे, सदर कामाची व आर्थिक व्यवहाराची चौकशी करुन दोषी असणाऱ्याकडून रक्कम वसूल करावी व त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई होणेसाठी होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रया."

(२) **ॲड.निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे शहरात अंतर्गत मेट्रोचा प्रस्ताव मंजूर होण्यापूर्वीच जुन्या इमारतींच्या बांधकामांना मंजुरी नाकारण्याचे प्रकार ठाणे महापालिकेकडून सुरू असणे, त्यामुळे मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रश्न जटील होण्याची भीती निर्माण होणे, त्यामुळे या इमारतींमध्ये राहणा-या नागरिकांच्या मनात निर्माण झालेली भीती व चिंतेचे वातावरण, शासनाने या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, या प्रकरणी ठाणे महापालिकेकडून जुन्या इमारतींच्या बांधकामांना मंजुरी देण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया."

(३) **प्रा.राम शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक १४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास कमल सिंघ व त्याचा सोबत असलेले काही सहकारी यांनी नगर जिल्ह्यातील गावागावात जाऊन लोकांना पैशाचे खोटे आमिष दाखवून अनधिकृतरित्या धर्मांतरण केल्याची बाब उघडकीस येणे, राहुरी येथील प्रगती विद्यालय आणि ब्राम्हणी येथे मोठ्या प्रमाणात स्थानिक लोकांचे धर्मांतर करून श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे पुढील कार्यक्रम नियोजित केलेला असणे, तसेच याबाबत अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी पोलीस स्टेशनमध्ये अनधिकृत धर्मांतरासंदर्भात विविध संघटनाच्या पाठपुराव्यामुळे दिनांक १५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास श्रीमती मीराबाई सुभाष हरेल यांनी

राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला असून अद्याप पोलीस विभागाकडून कोणतीही कारवाई केलेली नसणे, तसेच संबंधित आरोपी कमल सिंघ यांनी अहमदनगर जिल्ह्यात धर्मांतरासाठी ७५० कोटी रुपये आणले असून कमल सिंघ यांच्या विरुद्ध जो आवाज उठवेल त्याच्याविरुद्ध त्यांच्या माणसाकडून आणि स्थानिक पोलिसांकडून 'atrocity' गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात येणे, यासंदर्भात आरोपीला मदत करण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री यांनी आरोपी विरुद्ध कारवाई करु नये असे निर्देश पोलीस प्रशासनाला दिलेले असणे, याबाबत राहुरी पोलीस स्टेशनचे प्रभारी प्रताप दराडे आणि तपास अधिकारी यांनी आरोपी कमल सिंघ यांचा कडून मोठ्या प्रमाणात पैसे घेतलेले असणे, आत्तापर्यंत शासनाने पोलिसांविरुद्ध व दोषींविरुद्ध कोणतीच कारवाई केलेली नसणे, या गुन्हयांसंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"परभणी जिल्हयातील पाथरी तालुक्यातील डाकूपिंपरी येथे अधिकारी व वाळू तस्कर यांनी संगनमत करीत शासनाचे कोटयावधी रूपयाचे आर्थिक नुकसान करणे, परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील डाकू पिंपरी येथील वाळू गटाचा लिलाव झालेला असणे, वाळू लिलाव धारक हे जिल्हाधिकारी परभणी यांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०२२, रोजीच्या जा. क्र. २०२२/ महसूल/ गौ.ख/ प्र.क्र. ०१ प्रमाणे नमूद केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करत शासनाच्या गौण खनिजाची लूट व आर्थिक नुकसान करत असणे, लिलावधारकास या गौणखनिज घोटाळ्यात पाठीशी घालण्यासाठी काही स्थानिक महसूल अधिकारी हे आर्थिक तडजोड करून संगनमत करीत असणे, व शासनाच्या नुकसानीस कारणीभूत ठरणे, वाळू घाट लिलाव प्रकरणी जिल्हाधिकारी परभणी यांनी डाकू पिंपरी तालुका पाथरी जिल्हा परभणी येथील गट क्रमांक १२ मधून ६४३१ ब्रास वाळू उत्खननाबाबत परवानगी दिलेली असणे, १.८२ हेक्टर क्षेत्रफळ मधून ५२० मीटर लांबी, ३५ मीटर रुंदी व एक मीटर खोली अशा परिमाणा प्रमाणेच वाळू उत्खनन करणे बंधनकारक असणे, तसेच उत्खनन करण्यापूर्वी तालुका भूमि अभिलेख यांच्या कार्यालयामार्फत उत्खनन क्षेत्राचे सीमांकन निश्चित करून घेणे व त्या परवाना क्षेत्रात खांब (स्तंभ) उभारणे त्या क्षेत्रात तार फेंसिंग करून त्या आतीलच वाळू उत्खनन करणे बंधनकारक असणे, तसेच ठेकेदाराचे नाव, पत्ता नमूद

अस्वाक्षरित प्रत

असलेला ठळक फलक त्या जागी लावणे नियमाप्रमाणे असणे त्यांचे कुठेही पालन करण्यात आलेले नसणे, कुठेही खांब, तार फेंसिंग नसणे, सगळ्या नदीपात्रातून सर्रासपणे नियमभंग करीत उत्खनन करण्यात येणे, वाळू उत्खनन केवळ हातानेच करावी तसेच वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी, सक्शन बोट किंवा इतर कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर करण्यात येऊ नये, तसेच कोणतेही मोठी वाहने नदीपात्रात नेता येणार नाहीत, केवळ ट्रॅक्टर, ट्रॉली द्वारे वाळू डेपो पर्यंत वाळू वाहतूक करून त्याचा मुख्य रस्त्यावर डेपो करावा असा नियम असतानाही सर्रासपणे नदीपात्रात मोठी-मोठी वाहने, ट्रक्स, जेसीबी, पोकलेन, लोडिंग ट्रक नदीपात्रात नेऊन वाळू उपसा व वाहतूक करण्यात येणे, वाळू गटात सीसीटीव्ही बसविणे व त्यांचे २४/७ असे सलग सीसीटीव्ही फुटेज छायाचित्रण करावे व त्याचा एड्रेस जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना देणे बंधनकारक असणे जर सीसीटीव्ही फुटेज खंडित किंवा बंद ठेवला किंवा केला असेल तर त्याबाबत दंड आकारण्यात यावा याबाबत जिल्हाधिकारी परभणी यांनी नियमा प्रमाणे अटी व शर्तीत नमूद केलेले असणेअसे असतानाही कुठेही सीसीटीव्ही बसवलेले नाहीत किंवा त्याचे सलग छायाचित्रण जिल्हाधिकारी परभणी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसणे. उत्खननाचे अधिकृत परवानगी असलेल्या गट क्रमांक १२ ऐवजी परवानगी नसलेल्या नदी पात्रामधील परिसरातून सुद्धा अनधिकृतपणे वाळूचे उत्खनन करून सुमारे २५ हजार ब्रास पेक्षा जास्त वाळूचे अवैध उत्खनन करून चोरी करण्यात येणे, वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनासोबत e-TP वाहतूक पास असणे बंधनकारक करण्यात आलेले आहे परंतु स्थानिक महसूल प्रशासन अशा कोणत्याही पासची तपासणी करत नसल्याने केवळ २ किलोमीटर अंतरावर असलेल्या बीड जिल्हा हद्दीत अश्या चोरीच्या वाळूचे वाहतूक व विक्री केली जाणे, वरील सर्व प्रकरणांची, नियम भंगाची व आर्थिक नुकसान / घोटाळ्याची दक्षता व भरारी पथकामार्फत जायमोक्यावर पावसाळयापूर्वी (ON THE SPOT) जाऊन ड्रोन कॅमेरा व ETS मशीनने प्रत्यक्ष तपासणी करून दोषी कंत्राटदारांची मालमत्ता जप्त करून आर्थिक दंड वसूल करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०२२ दरम्यान मुख्य सचिव यांच्याकडे ईमेलव्दारे करणे, परंतु त्यांच्या स्तरावरून कोणतीही सक्षम कारवाई न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री प्रसाद लाड,** प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ. परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे

**मत्स्यविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्याला ७२० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला असून राज्याच्या किनारपट्टीवर ७ सागरी जिल्हे असणे, सागरी किनाऱ्यांवरील भागात ट्रॉलिंग, पर्ससीन, बॅगनेट, गिलनेट, हुकलाइन अशा विविध पद्धतीने मासेमारी करण्यात येत असणे, कोकणात सागरी मासेमारी हा प्रमुख व्यवसाय असल्याने साधारणपणे चार लाख मच्छीमार कुटुंबे या व्यवसायावर अवलंबून असणे, मत्स्य व्यवसाय हा कृषीपूरक व्यवसाय असल्याचे यापूर्वीच सरकारने मान्य केले असणे, तसेच या व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असून परकीय चलनही प्राप्त होत असणे, मत्स्यव्यवसायाकरिता मच्छिमारांना नौका बांधणीसाठी मोठ्याप्रमाणावर भांडवली गुंतवणूक करावी लागत असून नियमितपणे जाळी, नौका दुरुस्ती, नौकेवरील साहित्य, सामुग्री दुरुस्ती, खलाशी, कर्मचारी यांचे वेतन, डिझेल, बर्फ, रेशन यावर आवर्ती खर्च करावा लागत असणे, मच्छीमारांची उत्पन्नाची क्षमता लक्षात घेता त्यांना कर्जाऊ रक्कम उभारण्याशिवाय पर्याय नसणे, मच्छीमारांना अनेक वेळा नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत असून गेल्या दोन-तीन वर्षात 'क्यार', 'महा', 'निसर्ग', 'तौक्ते' अशा चक्रीवादळांमुळे व दरवर्षी २ महिने व्यवसायबंदीमुळे मच्छिमारांचे उत्पन्न बुडून बोटी, नौका नादुरुस्त किंवा पूर्णपणे नष्ट झाल्या असणे, शासनामार्फत शेतकऱ्यांना सवलतीच्या व्याजदराने पीक कर्ज दिले जात असले तरी मत्स्यव्यवसायाला मत्स्यशेतीला अधिकृत दर्जा मिळाला नसल्यामुळे त्यांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज मिळत नसणे, त्यामुळेच मच्छीमारांकडून मत्स्यव्यवसायाला मत्स्यशेतीचा दर्जा द्यावा, अशाप्रकारची मागणी सातत्याने शासनाकडे केली जात असणे, या संदर्भातील प्रस्ताव मत्स्यव्यवसाय आयुक्तांकडून राज्य शासनाला सादरही झाला असणे, तसेच, मासेमारीला मत्स्य शेतीचा दर्जा द्यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाला वारंवार केली असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(६)** **श्री.अंबादास दानवे,** डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अनिकेत तटकरे, अमोल मिटकरी, आमश्या पाडवी, विक्रम काळे, बाळाराम पाटील, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बाल आणि माता यांच्या आरोग्यांसंबंधी शासनाच्या पातळीवर सुमारे डझनभर योजना राबविण्यात येत असतांनाही मेळघाटात कोवळी

अग्रिम प्रत

पानगळ सुरु असल्याची धक्कादायक बाब माहे ऑगस्ट, २०२२ रोजी च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास उघडकीस आलेली असणे, माहे एप्रिल ते जून या तीन महिन्यांच्या कालावधीत शून्य ते सहा वर्षाच्या जवळपास ५३ बालकांचा आणि १९ अर्भकांचा मृत्यू झालेला असणे, आरोग्य विभागाच्या अहवालानुसार मेळघाटात सर्वसाधारण श्रेणीत अंदाजे ३२ हजार ५७६, तीव्र कुपोषित (सॅम) ४०९ तर मध्य कुपोषित (मॅम) श्रेणीत अंदाजे ३ हजार ३४६ बालके असल्याचे निदर्शनास आलेले असणे, मेळघाटात कुपोषित बालके, गर्भवती तसेच स्तनदा मातांना बालरोग आणि स्त्री रोग तज्ञांची सेवा उपलब्ध करुन देण्यास शासन स्तरावरुन होत असलेली दिरंगाई, उपलब्ध करुन देण्यात आलेल्या स्त्रीरोग तज्ञ कार्याच्या ठिकाणी पोहोचत नसणे किंवा आठवड्यातून २-३ दिवस हजेरी लावत असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, स्थानिकांकडून मेळघाटातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बालरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञांची कायमस्वरुपी नेमणूक करावी अशी होत असलेली मागणी, कोवळी पानगळ थांबविण्यासाठी शासनाने करावयाची तातडीने उपाययोजना व याबाबत शासनाची भुमिका."

(७) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक १ सप्टेंबर २००५ रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांचेकडे पनवेल तालुक्यातील धोधाणी या आदिवासीवाडी जवळून धोधाणी-माथेरान रोप-वे (रज्जूरथ) मार्ग शासनाने सुरू करावा असा प्रस्ताव श्री. सुधाकर लाड, रा.सुकापूर, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांनी दिलेला असणे, महाराष्ट्र शासनाने धोधाणी-माथेरान रोप-वे प्रकल्पाला मान्यता दिलेली असून एमएमआरडीएनेही सदर प्रकल्पाला मंजूरी दिलेली असून सदर प्रकल्पाला अंदाजे १०० कोटी रूपये खर्च अपेक्षित असणे, मुंबईजवळ असलेल्या रायगड जिल्ह्यातील निसर्गरम्य माथेरान या प्रसिध्द थंड हवेच्या ठिकाणी सातत्याने होत असलेल्या अतिवृष्टीचा फटका बसत असल्यामुळे रेल्वे मार्गावर मोठ-मोठ्या दरडी कोसळणे, रेल्वे मार्गाखालील मातीची धुप होणे या कारणांमुळे माथेरानची मिनी रेल्वे सातत्याने बंद पडणे, वाहनांसाठी असलेला नेरळ-माथेरान रस्ता हा दस्तूरीनाका पर्यंत खाजगी वाहनांना परवानगी असल्याने माथेरानला जाण्यासाठी मिनी रेल्वे मार्गाशिवाय दुसरा पर्याय नसणे, त्यामुळे माथेरानला जाणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत घट झाली असणे, निसर्गरम्य

अग्रिम प्रत

माथेरान या देश-विदेशांतील पर्यटकांना आकर्षण असलेल्या पर्यटनस्थळी जाण्यासाठी भविष्याचा विचार करता पर्यायी मार्ग म्हणून माथेरान डोंगराच्या कुशीत असलेल्या पनवेल तालुक्यातील धोधाणी ते माथेरान असा रोप-वे (रज्जूरथ) मार्ग करण्याचा शासनाने विचार करणे आवश्यक असणे, महाराष्ट्रातील एकमेव असा किल्ले रायगड रोप-वे प्रकल्प जोग इंजिनिअरिंग कंपनीने उभारलेला असून जोग इंजिनिअरिंग कंपनीसारख्या रोप-वे उभारण्याचा अनुभव गाठीशी असलेल्या कंपनीच्या माध्यमातून आणि खाजगीकरणाच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाला धोधाणी-माथेरान रोप-वे मार्ग सुरू करणे सहज शक्य होणे, सबब धोधाणी-माथेरान रोप-वे मार्ग सुरू केले तर महाराष्ट्रातील एकमेव किल्ले रायगड रोप-वे प्रमाणे फक्त ५ मिनिटांत धोधाणीवरून माथेरानला जाता येणे शक्य होणे, पनवेल ते माथेरान रस्त्याची योजना गेली अनेक वर्षे शासनाकडे प्रलंबित असणे, पनवेलपासून २० कि.मी अंतरावर असलेल्या धोधाणीपर्यंत गेलेला रस्ता पुढे माथेरानला नेण्याचा शासनाचा विचार असणे, धोधाणी आदिवासीवाडीपासून माथेरानसारख्या उभा कडा असलेल्या दुर्गम डोंगरावर रस्ता करणे इतके सोपे नसल्यामुळे पनवेल-धोधाणी मार्गे माथेरान या रस्त्याची योजना गेली अनेक वर्षे रखडलेली असणे, माथेराच्या कुशीत असलेल्या निसर्गरम्य धोधाणीपर्यंत रस्त्याचे रूंदीकरण करून धोधाणी-माथेरान रोप-वे असा मार्ग तयार केल्यास नागरिकांसह पर्यटकांना पनवेल-धोधाणी मार्ग माथेरानला जाणे जलद व सुखकर होणे शक्य असणे, सदर रोप-वे प्रकल्पामुळे अनेक उद्योग करण्याची इथल्या आदिवासींना संधी उपलब्ध होईल तसेच विकासापासून शेकडो वर्षे वंचित असलेल्या आदिवासींच्या विकासाला पोषक वातावरण तयार होईल व या परिसरात नवीन पर्यटन क्षेत्र विकसीत होईल व त्या अनुषंगाने विविध उद्योगधंदे या परिसरात सुरू करणे शक्य असणे, सबब धोधाणी-माथेरान रोप-वे (रज्जूरथ) मार्ग प्रकल्पास मान्यता देऊन सदर रोप-वे मार्ग सुरू करण्यात यावा, यासाठी शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

(८) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहर आणि उपनगरात वास्तव्य करणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना शिधावाटप दुकानांत कधीच पूर्ण धान्य मिळत नसल्याची गंभीर बाब माहे ऑगस्ट, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास समोर येणे, त्यामुळे सामान्य मुंबईकर जनता मेटाकुटीस आलेली

अस्वाक्षरित प्रत

असणे, मुंबई आणि उपनगरात अनेक शिधापत्रिकाधारकांकडे केवळ नावाला शिधापत्रिका असणे, मुंबई व उपनगरातील सुमारे दीड ते दोन लाख शिधापत्रिका कार्ड सद्यस्थितीत बंदवस्थेत असणे, सदर कार्ड पुनश्च सुरु करण्यात नागरिकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागणे, गत सात ते आठ महिन्यांपासून याबाबतची ऑनलाईन सेवा पूर्ण क्षमतेने कार्यरत नसणे, त्यामुळे शिधा मिळण्यासाठी शिधापत्रिका धारकांना आधारकार्ड क्रमांक सादर करण्यासाठी देण्यात आलेली दि. ३० जून, २०२२ पर्यंतच्या मुदतीत वाढ करण्याची असलेली नितांत आवश्यकता, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी मुंबई व उपनगरातील गोरगरीब शिधापत्रिकाधारकांत शासनाप्रती पसरत चाललेला असंतोष आणि नाराजीची भावना, यास्तव आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगरातील शिधावाटप दुकानात पुरेसा शिधा उपलब्ध करून देण्यासह बंद असलेली शिधापत्रिकाकार्ड पुनश्च सुरु करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना येत असलेल्या अनंत अडचणी दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(९) **श्री.अमरनाथ राजूरकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नांदेड जिल्हयात सोयाबीनच्या उभ्या पिकावर गोगलगाईंचा प्रादुर्भाव झाला असून शेतातील उभे पीक नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे ऑगस्ट,२०२२ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास येणे, याशिवाय येथे शेतातील भाजीपाल्यावरही गोगलगाईचा प्रादुर्भाव होणे, तसेच हिरव्या अळयांनीही पिके फस्त केली असणे, आधीच अतिवृष्टीमुळे पिके धोक्यात असणे, त्यात आता गोगलगाई व अळयांनी पिकांवर आक्रमण केल्यामुळे येथील शेतकरी पुन्हा संकटात सापडणे, त्यामुळे आता येथे सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट निर्माण होण्याची शक्यता यावर उपायोजना म्हणून येथील शेतकऱ्यांनी सोयाबीन व इतर पिकांवर महागडी औषधे फवारणे, मात्र त्याचा उपयोग न होणे, त्यामुळे आता पिकांचा उत्पादन खर्चही निघेल की नाही या चिंतेत येथील शेतकरी असणे, यामुळे या शेतपिकांच्या नुकसानीचे शासनाने तातडीने पंचनामा करुन बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देणे आवश्यक असतानाही त्यावरील कारवाईस शासनाकडून होत असलेला विलंब परिणामी येथील शेतकऱ्यांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

(१०) **सर्वश्री किरण सरनाईक,** विक्रम काळे, सतिश चव्हाण, कपिल पाटील, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री जयंत आसगावकर, बाळाराम पाटील, किशोर दराडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील अनुदानित शाळा व तुकडयावरील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना समायोजनासह सेवा संरक्षण मिळत असणे, परंतु अंशतः अनुदानित शाळा व तुकडयावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण मिळत नसणे, शिक्षण आयुक्त, पुणे व शिक्षण संचालक पुणे यांनी अंशतः अनुदानित शाळा व तुकडयावरील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना समायोजनासह सेवा संरक्षण देणेबाबतचा अहवाल शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आलेला असणे, सदर प्रस्ताव मंजूर करून संबंधित कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

# - मध्यंतर —

**सहा : शासकीय विधेयके —**

(१) **विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक २३ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२२"

---

(२) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(क)** "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक २० - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२२ "

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, अभिजीत वंजारी, सतिश चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक २० - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२२

अग्रिम प्रत

विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ख)** "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १८ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, अभिजीत वंजारी, सतिश चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १८ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**सात : (क)** **(गुरुवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ व सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री अंबादास दानवे**, अमरनाथ राजूरकर, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, आमश्या पाडवी, विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री सतीश चव्हाण, विलास पोतनीस, सतेज उर्फ बंटी पाटील, सुनिल शिंदे, दुष्यंत चतुर्वेदी, अशोक उर्फ भाई जगताप, सचिन अहिर, अनिकेत तटकरे, मोहनराव कदम, अमोल मिटकरी, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अरुण लाड, जयंत आसगावकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"सन २०२२ च्या माहे जुलै-ऑगस्ट महिन्यात प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील इतर भागात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली असून जिरायती व बागायती पिकांचे, घरांचे, पशुधनाचे नुकसान झाले असणे तसेच सुमारे १२५ पेक्षा जास्त लोकांना आपल्या प्राणास मुकावे लागले असणे, विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ तसेच मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली व बीड आदी जिल्ह्यात सर्व पिके

वाहून, कुजुन व सडून गेलेली असणे, सोयाबीन, कापूस व तूर सारख्या नगदी पिकांचे तसेच नगदी पिकांबरोबरच केळी, संत्रा व तत्सम फळपिकांचेही नुकसान झालेले असणे, राज्यातील काही भागात, विशेषत: बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात सोयाबीन पिकावर गोगलगायीचा व हळदया (यलो मोझाक) प्रादुर्भाव झाला असून शासनाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना न झाल्यामुळे सोयाबीन उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असणे, पीक नुकसानी बरोबरच हजारो ठिबक व तुषार सिंचन संच वाहून गेले असून त्यात मातीचा गाळ जाऊन ते नादुरुस्त झालेले असणे, शासन निर्णयानुसार पुढील ७ वर्ष नवीन संच बसविण्यास अनुदान देय नसल्यामुळे शासनाने सदरची अट शिथिल करण्याची आवश्यकता असणे, अतिवृष्टीत राज्यातील हजारो हेक्टर शेतजमीन वाहून व खरडून गेल्याने त्या पुर्णपणे नापीक होण्याची भीती निर्माण झाली असणे, अनेक विहिरी गाळाने भरुन नादुरुस्त झाल्या असणे, मोठे ओढे व नदी नाले यांनी आपली पात्रे बदलल्याने काठावरील सुपीक जमीन नापीक झाली असणे, सततच्या व मोठ्या प्रमाणावर झालेल्या पावसाने काही जिल्ह्यातील पुलांचे तसेच पांदण रस्ते, ग्रामीण व प्रमुख जिल्हा मार्ग मोठ्या प्रमाणावर नादुरुस्त झाले असून मोठ्या खड्डयांमुळे अपघाताला सामोरे जावे लागत आहे व अनेक गावे अजुनही तालुक्याच्या प्रमुख गावाच्या संपर्कात आलेली नसणे, अनेक गावात विजेचे खांब अद्यापही पडलेले आहेत आणि ट्रान्सफॉर्मर व विद्युत वाहिन्या नादुरुस्त होऊन वीज वितरण व्यवस्था पुर्णत: कोलमडलेली असणे, परिणामी अनेक गावात अद्यापही वीज नसणे, पुराचे पाणी घरात शिरल्याने घरांची, गोठ्यांची, दुकानांची, टपऱ्यांची मोठया प्रमाणावर पडझड होऊन संबंधितांचे नुकसान झाले असणे, बराच काळ पाणी घरात राहिल्याने काही घरे पुर्णपणे ढासळलेली असून गाई-गुरांसह इतर पशुधन पाण्यामध्ये वाहून गेलेले असणे, मजुरांना या सर्व काळात व पुढील काही काळ मजुरी मिळणार नसल्यामुळे विशेष बाब म्हणून मजुरांना त्यांच्या झालेल्या नुकसानीसाठी आर्थिक मदत करण्याची आवश्यकता असणे, शासनाने तातडीने लक्ष न दिल्याने नाउमेद होऊन अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असणे, अनेक भागातील धरणे पूर्ण क्षमतेने भरुन ओसंडून वाहत असून पूरपरिस्थिती निर्माण झाली असणे, परिणामी या भागातील ठिकाणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, जलसंपदा विभागाने आताच पूर परिस्थिती नियंत्रणाचे नियोजन करणे आवश्यक असणे, तसेच कोकणामध्ये ऐन लावणी करण्याच्या वेळी जवळपास १५ दिवस पाऊस नसल्याने भात व नागली पिकाची रोपे सुकून जाणे, तर महाराष्ट्रातील काही भागामध्ये पर्जन्यमान कमी असल्याने झालेली पिकांची हानी व संभाव्य पाणीटंचाई निर्माण होणे, एकंदरीतच विदर्भ, मराठवाडा व इतर विभागातील अतिवृष्टीमुळे पिके, फळपिके, शेतजमीनी, रस्ते, विजव्यवस्था, घरे यांच्या

अप्रकाशित प्रत

नुकसानीसाठी शासनाने जाहीर केलेली मदत अत्यंत तुटपुंजी असून अनेक घटकांचा त्यात समावेश झालेला नसणे, अतिवृष्टी भागात अद्यापही रु.५० हजार सानुग्रह अनुदानाचे वाटप न करणे, शासनाने कोरडवाहूसाठी हेक्टर ७५ हजार रुपये तसेच फळपिकांसाठी हेक्टरी दीड लाख रुपयांचे तसेच सर्व घटकांचा समावेश करुन त्यांना ठोस मदत जाहीर करण्याची आवश्यक असणे, शेतकऱ्यांनी खरीप हंगामाकरीता पीक कर्ज घेतलेले असून अतिवृष्टीमुळे कर्ज परतफेड करणे त्यांना शक्य नसणे, या हंगामासाठी घेतलेल्या कर्जाची माफी करण्याची लोकप्रतिनिधींची व शेतकऱ्यांचीही आग्रही मागणी असणे, तथापि, शासनाकडून याबाबत दुर्लक्ष होत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ख)** **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, राजहंस सिंह, चंद्रशेखर बावनकुळे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय सुरेश धस, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री गोपिचंद पडळकर, प्रविण दटके, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रविण पोटे पाटील, निलय नाईक, वसंत खंडेलवाल, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून मागील काळात मुंबई शहराच्या तसेच एमएमआर भागातील मुलभूत पायाभूत सुविधांची पुर्णपणे दुरवस्था झालेली असणे, मुंबई शहरामध्ये गृहनिर्माण किवा परिवहन (गतीशीलता) हे महत्वाचे मुद्दे असून मुंबई शहराकरिता २८६ कि.मी.च्या मेट्रोचे काम धीम्या गतीने झाल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी मेट्रोचा खर्च १० हजार कोटीने वाढून मुंबईकरांना मेट्रोपासून वंचित ठेवण्यात येणे, मागील काळात एसआरएच्या माध्यमातून १५ लाख घरे उपलब्ध होण्याची आवश्यकता असताना फक्त २ लाख घरांची निर्मिती एसआरएच्या माध्यमातून झाल्याचे निर्दशनास येणे, एसआरएमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचारामुळे झोपडपट्टी पुर्नविकास प्रकल्प प्रलंबित असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची प्रगती न होणे, २०११ पर्यंत सर्व झोपडपट्टीतील घरांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे देण्याचा कायदा होऊनही सदर कायद्याची अंमलबजावणी न होणे, पत्राचाळ पुर्नविकास प्रकल्पातील भाडेकरूंना बेघर करून त्यांना भाडे न मिळणे, तसेच, बी.डी.डी. चाळीचा खोळंबलेला पुर्नविकास, धारावीचा खोळंबलेला पुर्नविकास पोलीसांकरिता मोफत घरांच्या धोरणाची अंमलबजावणी न होणे, मुंबई शहरातील गावठाण व कोळीवाडयाकरिता विशिष्ट डी.सी. आर. अद्याप तयार न होणे, तसेच विमानतळाच्या आजूबाजूच्या परिसरातील फनेल झोनमधील पुर्नविकास

अस्वाक्षरित प्रत

खोळंबला असणे, गिरणी कामगार व पोलीसांच्या घरकुल योजनेमध्ये संथगतीने झालेली प्रगती, केंद्र शासनाच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्यांचा पुनर्विकास न होणे, तसेच रेल्वेच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांना संरक्षण न मिळणे व वन जमिनीवरील रहिवाशांना पायाभूत सुविधांपासून वंचित रहावे लागणे, अशा अनेक प्रकारच्या घरकुल योजनांमध्ये व एसआरए आणि म्हाडामध्ये झालेल्या भ्रष्टाचारामुळे हा विकास खोळंबलेला असणे, एसआरए व म्हाडामध्ये विशेष करून गेल्या अडीच वर्षामध्ये प्रति चौरस फुटाच्या किंमतीचा बाजार मांडलेला असणे, तसेच, गेल्या २५ वर्षांमध्ये मोठया प्रमाणावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार व गैरव्यवस्थापन परिणामी मुंबईकरांच्या स्वप्नातील मुंबई दृष्टोत्पतीस न येणे, रस्त्यांमधील चरभरणी, उद्याने व बाजारांमध्ये तसेच कोविड कालावधीत सुध्दा मोठया प्रमाणात गैरव्यवहार उघडकीस आला असून गेल्या २५ वर्षातल्या मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहाराची मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी नेमण्याची आवश्यकता, तसेच, विशेष सीएजी (कॅग) ऑडिट करण्याची आवश्यकता, मोठया प्रमाणावर गेल्या २ महिन्यांमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या संगणक खरेदीमध्ये घोटाळा झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक २७ वस्तू अद्यापपर्यंत मिळाल्या नसणे, त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर होणारा दुष्परिणाम, तसेच मुंबईची मेट्रो ही मास ग्रीन ट्रान्सपोटेशन सिस्टीम असून मेट्रोचे काम थांबल्यामुळे मुंबईच्या पर्यावरणाचा झालेला ऱ्हास तसेच पवई तलावामध्ये सायकल ट्रॅक करण्याचा अट्टाहास, त्यामुळे मुंबईच्या पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, मुंबई शहराच्या कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट होत नसल्यामुळे मुंबईचे वातावरण व हवामान प्रदुषित होत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच मुंबई शहरातील शासकीय जमिनीवर असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांना आकारण्यात आलेला अकृषीक कर पूर्णपणे वगळण्याची आवश्यकता, मुंबईच्या कोळीवाडा व गावठाणाकरिता वेगळा डीसीआर तयार करण्याची प्रक्रिया प्रलंबित राहिल्यामुळे मुंबईचे कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था, मुंबई शहरामध्ये पोलिसांची संख्या कमी असल्यामुळे खास करुन मुंबई पोलिसांची भरती करण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा राबविण्याची आवश्यकता, तसेच माहे नोव्हेंबर, २०१९ ते जुन २०२२ या कालावधीमध्ये गृहविभागात मोठया प्रमाणात झालेला भ्रष्टाचार, गैरव्यवहार व अनियमितता झालेली असून यासंदर्भात शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

अशासकीय प्रत

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री नागोराव गाणार,** प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, **वि.प.स.**

"**राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करणेबाबत**" या विषयावरील **डॉ.रणजित पाटील व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **१२२६८** ला दिनांक ०८ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, नरेंद्र दराडे, **वि.प.स.**

"**राज्यात विशेषत: मुंबईमध्ये वातावरणातील बदल आणि तापमान वाढीमुळे येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींवर उपाययोजना करण्याबाबत**" या विषयावरील **श्री.प्रसाद लाड व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **१०७३३** ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २२ ऑगस्ट, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत